# सूचक निष्कर्ष

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## प्रकरण ३ रे

नाटकात प्रस्तुत केलेला निसर्ग केवळ रसपरिपोषात्मक किंवा मानवी अविष्कारांनी युक्त, असा नसून आगामी संकटांची चाहूल देणारा, पुढील घटनांचा निदर्शक म्हणून, वातावरण निर्मिती साठी ही पुढे सरसावलेला दिसतो.

आता अशी काही निसर्गस्थळे पाहू की जेथे निसर्गाने सूचकाची भूमिका केली आहे. याही बाबतीत प्रथम कालिदासाची नाटके विचारात घेणे श्रेयस्कर ठरेल.

नीवारा: शुकगर्भकोटर प्रमुख भ्रष्टास्तरूणामध: ।
प्रस्निग्धा: क्वचिदिड्.गुदीफलभिद: सूच्यन्त एवोपला: ।।

विश्वासोपगमादभिन्नगतय: शब्दं सहन्ते मृगा-
स्तोयाधारपथाश्च वल्कलशिखानिष्यन्दरेखांकिता: ।।१४।। १ शा

या श्लोकात वर्णिलेल्या गोष्टींवरून, म्हणजे पोपटांच्या तोंडातून पडलेल्या रानसाळी, इंगुदीफळे फोडण्यासाठी वापरलेले तुळतुळीत दगड रथाचा आवाजही शांतपणे सहन करणारी आणि मनात विश्वास बाळगणारी हरिणे, वल्कलातून झिरपलेल्या तळ्याच्या पायवाटेवरील पाण्याच्या रेघा इ. च्या वर्णनातून कालिदासाने आश्रमीय वातावरणाचे सूचन केले आहे. आश्रमातील वातावरण कसे असते याचे प्रत्यक्ष वर्णन न करता या सूचक वर्णनावरून रसिक प्रेक्षकांनी ती आश्रमभूमी असल्याचा तर्क करावा. या वस्तुनिष्ठ,तर्कसंगत वर्णनामुळे हा तपोवनाचा परिसर आहे हे सहज लक्षात येते. रथाचा आवाज ऐकून ही हरीण आपली चाल बदलत नाही. स्वभावत: भित्रे असे हरीण ही येथे आश्वस्त आहे. असे होऊ शकते फक्त तपोवनातच तेथे त्याला अभय असते. कोणत्याही प्रकारचे संकट नाही हे ते जाणून असते.

वल्कलातून ठिबकणारे पाणी तेथील मानवाचे अस्तित्व दर्शविते. म्हणूनच येथे राजा दुष्यन्त म्हणतो की कोणी न सांगताही हे तपोवन आहे हे ध्यानात येते.

एवढेच वर्णन करून राजा थांबत नाही तर

कुल्यांभोभिः पवनचपलैः शाखिनो धौतमूला
भिन्नो रागः किसलयरुचामाज्य धूमोद्गमेन।
एते चार्वागुपवनभुवि च्छिन्नदर्भाङ्कुरायां
नष्टाशङ्का हरिणशिशवो मन्दमन्दं चरन्ति ।। १५.१ शा.

पाटाच्या वाऱ्याने हेलकावणाऱ्या पाण्याने झाडांची मुळे उघडी पडली आहेत. म्हणजे नुकतेच पाणी दिले गेले आहे. तुपाची आहुती देऊन केलेल्या यज्ञीयधूमाने कोवळी पालवी धूसर बनली आहे. आणि दर्भांकुराचा यथेच्छ फराळ करीत हरिणपाडसे शांतपणे विहरत आहेत.

या वर्णनावरून तपोवनातील दैनंदिन जीवन, यज्ञयाग, व्यवस्थित सुरु आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विघ्न नाही म्हणून खंड ही नाही. मानवांच्या संगतीत हरीण शावके ही निर्भयपणे निवास करीत आहेत. तपोवनाची शोभा वाढवीत आहेत. हे आश्रमातील वातावरणाचे वर्णन म्हणजे एक प्रकारे राजा दुष्यन्ताच्या समर्थ, सुव्यवस्थित राजनीतीचेच द्योतक आहे.

"यावत्त्वयोपगतया लतासनाथ इवायं केसर वृक्षक : प्रतिभाति। शाकुंतलेची सखी प्रियंवदा शाकुंतलेला म्हणते, क्षणभर तिथेच थांब या या बकुलवृक्षाजवळ तू उभी राहिलीस की एखाद्या लतेबरोबर त्याचे मीलन झाल्यासारखे वाटते. वृक्षलतेचे साहचर्य ही निसर्गातील नेहमी प्रत्ययाला येणारी गोष्ट आहे. पण एखाद्या लते सारख्या सुकुमार सुंदरीचे

साहचर्य वृक्षाजवळ असणा-या लतेची जागा घेते तेव्हा निसर्ग आणि मानवातील ती एकरूपता असते. शिवाय यातून कालिदासाने एक महत्त्वपूर्ण नाटयसूचना दिली आहे. पुढे घडणारी घटना या वाक्याद्वारे म्हणजेच निसर्गाद्वारे सूचित केली आहे.

एका अनुरूप अशा वराशी शाकुंतलेचे मीलन होण्याची संभावना आहे. ती वेळ आता समीप आली आहे अशी सूचना येथे मिळते. म्हणजेच नाटकाच्या पुढील भागात काय दिसणार आहे याचा तर्क प्रियंवदेच्या या वाक्यावरून करता येतो. पुढे पुढे तर या सूचक वर्णनाला अधिक गहिरा रंग चढतो.

अम्मो ! सलिल सेक संभ्रमोद्गतो नवमालिकामुज्झित्वा वदनं मे मधुकरो ऽ भिवर्तते ।

पाणी शिंपडल्याने गडबडून उठलेला हा भ्रमर नवमालिकेला, सोडून माझ्याच तोंडाभोवती घिरट्या घालू लागला आहे ।
भ्रमर नेहमी पुष्पाभोवती रुंजी घालताना दिसतात पण येथे पुष्पा-भोवतालचे भ्रमराचे गुंजन शाकुंतलेच्या वदनपुष्पाभोवती दाखवून कालिदासाने सूचकतेला नवा बहर आणला आहे. त्या भ्रमरा[illegible]ही तिचे वदन हे फुलासारखी कोमल भासले आहे. किंबहुना वदनपुष्प आणि नवमालिकापुष्प यातील फरकच भ्रमराला जाणवला नाही. फूल समजूनच तो तिच्या भोवती रुंजी घालू लागला. या फुलाच्या चाहत्या भ्रमराप्रमाणेच शाकुंतलेचा चाहता तिच्याभोवती लवकरच रुंजी घालणार आहे. भ्रमरासारखा प्रेमी लवकरच तिच्या जीवनात येणार आहे याची सूचना या वाक्यातून देण्याचा अवसर कालिदासाला मिळाला आहे आणि दुष्यंताच्या प्रवेशासही हाच

अवसर कालिदासाने योग्य मानला आहे. पुढे घडणाऱ्या कथेचे सूत्रच जणू कालिदासाने सूचना रूपाने ग्रथित केले आहे. आता हेच पहा ना -

"अनसूये, अभिनवकुशसूच्या परिक्षतं ते चरणम्।
कुरबकशाखापरिलग्नं च वल्कलम्।"

शाकुंतला आपल्या सख्यांना म्हणते - अनसूये, कोवळया दर्भाचे टोक माझ्या पायात रुतले आहे अन् कोरांटीच्या फांदीत माझे वल्कल गुंतले आहे.

राजा दुष्यन्ताच्या प्रथम भेटीनंतर लगेचच त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रसंग येतो तेव्हा काही तरी निमित्त काढून त्या राजर्षीला पुन्हा पहावे हा शाकुंतलेचा हेतू - अगदी सहजपणे कालिदासाने निसर्गाच्या कानात ही गोष्ट सांगितली आणि आश्रमाच्या भूमीतील दर्भाचे टोक नेमके त्याचवेळी शाकुंतलेच्या पायात बोचले. ते काढायला एक क्षणाहून अधिक काळ लागणार नाही म्हणूनच की काय निसर्गाने दुसरी योजना लगेचच अमलात आणली. वाऱ्यावर उडणारे शाकुंतलेचे वल्कलरूपी वस्त्र कोरांटीच्या फांदीत गुंतले. कोरांटीची फांदी काटेरी। तिच्यात गुंतलेले वल्कल-चटकन निघणार थोडेच ? निसर्गाच्या विविध छटा दाखविताना कालिदासाचे कौशल्य मोहरून आल्यासारखे वाटते.

कोवळया दर्भाचे टोक पायात रुतणे आणि कोरांटीच्या फांदीत वल्कल गुंतणे यातून कालिदासाने नायिकेचे मन राजाच्या ठायी गुंतणे आणि प्रेमाचे नाजूक भाव हृदयात अंकुरणे सूचित केले आहे.

स्वाभाविक सहजतेने सूचित केलेली ही प्रेमभावना शब्दाविना साकार करण्याचे सामर्थ्य निसर्गात आहे. हे या उदा. द्वारे पटते. राजासमोरून जावे तर लागणारच आहे. पण राजाला, आपल्या

प्रेमनिधानाला पुन्हा एकदा पहावेसे वाटणे साहजिक आहे आणि पुढील कथा ओघावती होण्याच्या दृष्टीने हे सूत्र कालिदासाने अतिशय कौशल्यपूर्ण रीतीने गुंफले आहे. यामुळे कदाचित राजालाही दिलासा मिळाला असेल की यातून तिला आपले मन ही वल्कलाप्रमाणे गुंतले आहे हे तर सुचवायचे नसेल ? एरवी आश्रमाची वाट तीच होती. शाकुंतलेला ती नवी नव्हती आणि सा-या उद्यानभर हिंडताना तिचे वल्कल कुठेही गुंतले नव्हते पण आता जाताना मात्र या गोष्टी घडल्या त्याला कारणही तसेच होते. यावरूनच कालिदासाची कल्पकता सूचकता आणि त्यासाठी माध्यम म्हणून त्याने केलेला निसर्गाचा वापर यांचा निकष लागतो.

> स्मर एव तापहेतुर्निर्वापयिता स एव मे जातः
> दिवस इवाभ्रश्यामस्तपात्यये जीवलोकस्य १०.३

ग्रीष्म ऋतूच्या शेवटी मेघांनी झाकोळून गेलेला दिवस सर्व जगाला सुखवितो त्याप्रमाणे माझ्या दुःखाचे कारण असलेला मदनच आता मला सुखवितो आहे.

ग्रीष्मातले दिवस तप्त असतात तद्‌वत मदनज्वराने राजा पीडित झाला होता. परंतु ग्रीष्माच्या शेवटी मेघांनी झाकोळल्यामुळे दिवस अंधूक असला तरी पुढे मेघ वर्षाव करणार आहेत या विचाराने लोक खुष असतात. तसेच मदनाचा ताप केवळ आपल्यालाच होतो की काय या चिन्तेत असलेल्या राजाला शाकुंतलेच्या शब्दांनी दिलासा मिळाला असेल आणि आपल्या मनातील हे दिलासादर्शक विचार राजाने व्यक्तविले निसर्गरूपाने - त्याला आठवले ग्रीष्माचे दिवस. ग्रीष्माच्या दुपारी तप्त असतात. तद्‌वत मदनाचा ताप विरहकाळी त्रासदायक वाटतो पण तोच मदन ग्रीष्माच्या शेवटी झाकोळलेल्या दिवसासारखा दिलासा देणारा ठरतो. आपले

प्रेम एकतर्फी नाही त्याला योग्य प्रतिसाद मिळतो आहे. तिचेही आपल्यावर प्रेम आहे एवढे कळाले तरी तेवढयाने राजाला दिलासा मिळाला. प्रत्यक्ष पाऊस लगेच पडला नाही तरी मेघांना पाहून पाऊस पडणारच अशी आशा निर्माण होते. त्याप्रमाणे इथे राजाला आपली आशा फलद्रूप होण्याची चिन्हे दिसली आहेत. केवळ पात्रांच्या तोंडून निसर्ग रेखाटला आहे असे नव्हे तर पात्रांच्या उपस्थितीत पडद्याआडून नायक-नायिकेला सूचना देण्यासाठी निसर्गाची योजना केलेली आहे. याचे उत्तम उदा. म्हणजे,

"चक्रवाकवधुके, आमन्त्रयस्व सहचरम् उपस्थिता रजनी."

हे चक्रवाकप्रिये आपल्या प्रियाचा निरोप घे रात्र झाली आता ।

रात्री चक्रवाक एकमेकांपासून दूर जातात रात्र ही त्यांच्या दृष्टीने आपत्ती ठरते. या संकेताचा वापर करून येथे शाकुंतला व दुष्यंन्त यांची प्रणयाराधना वडीलधा-या मंडळींच्या लक्षात येऊ नये आणि ... प्रणयात गुंग असलेल्या त्या दोघांना आर्या गौतमीच्या आगमनाची सूचना मिळावी म्हणून चक्रवाकीच्या निमित्ताने शाकुंतलेला या सूचनेने सावध केले आहे. येथे प्रियाराधनात मग्न असलेल्या जोडप्याला, चक्रवाकांना जशी रात्र आपत्तीकारक वाटावी तसे आर्या गौतमीचे आगमन ही व्यत्ययकारक वाटले असावे. पण कितीही नको असली तरी रात्र टाळता येत नाही. म्हणून तिच्या आगमनाची सूचना देऊन सावध करावे या उद्देशाने चक्रवाकीला आपल्या प्रियाचा निरोप घेण्यास सांगितले आहे. यावरून शाकुंतलेने . आर्या गौतमीचे आगमन ओळखले. व ही सूचना आपल्यालाही आहे असे समजून दुष्यन्ताची भेट आटोपती घेतली. सुखानंतर दुःख दुःखानंतर सुख या चक्रानुसार मीलनानंतर विरह येतोच हे दाखविण्यासाठी कालिदासाने निसर्गातील घटकांचा वापर मोठ्या सूचकपणे केलेला आढळतो तो असा -

यात्येकतो ऽस्तशिखरं पतिरोषधीना -
नाविष्कृतोरुण पुर:सर एकतोऽर्क: ।
तेजोद्वयस्य युगपद् व्यसनोदयाभ्यां
लोको नियम्यत इवात्मदशान्तरेषु ।।२४. शा.

इकडे चंद्र अस्तशिखरावर उतरत आहे आणि इकडे अरुणाला पुढे करुन सूर्य प्रकट होत आहे एका तेजाचा अस्त आणि त्यावेळी दुस-या तेजाचा उदय या घटने मुळे निरनिराळ्या अवस्थांमध्ये सर्व जगाचे नियमनय होत असते जणू काही दिवसानंतर रात्र आणि रात्रीनंतर दिवस हा निसर्गक्रमय आहे. पण हा निसर्गक्रम येथे "चंद्र" अस्ताला जाऊन सूर्योदय होत आहे" अशा क्रमाने सांगून प्रीतीचे चांदणे संपून विरहदु:खाचे चटके बसणारा दिवस जवळयेत आहे अशी सूचना यातून दिली आहे. शाकुंतलेला दुष्यन्त ओळखणार नाही आणि तिला प्रीतीच्या शीतल चांदण्याऐवजी लोकापवादाचे चटके, प्रतारणा, अपमान सहन करावा लागणार आहे हेच सूचित केले आहे. तशाचप्रकारे आगामी संकटांची सूचना देणारा किंवा अंतर्मनाला जीजाणीव झाली त्यानुसार दु:खद असे काही घटित घडणार आहे असेच हा निसर्ग सुचवितो कारण कालिदासाला यावेळी सूर्योदयाबरोबर प्रफुल्लित होणारी पद्मिनी आठवली नाही. तर चंद्रास्ताबरोबर मलूल होणारी कुमुदिनी आठवली आहे.-

अन्तर्हिते शशिनि सैव कुमुद्वती मे
दृष्टिं न नन्दयति संस्मरणीय शोभा ।
इष्टप्रवासजनितान्यबलाजनस्य
दु:खानि नूनमतिमात्रसुदु:सहानि ।। ३.४ शा.

चंद्र अस्ताला गेल्यामुळे जिच्या सौंदर्याची स्मृता मागे रेंगाळत राहते अशी

कुमुदिनी माझ्या दृष्टीला सुखावीत नाही. कारण आवडत्या माणसांच्या विरहाने निर्माण झालेली दु:खे खरोखर पराकाष्ठेची दु:सह असतात.

ही कुमुदिनी पाहून ज्या कण्वशिष्याला एवढे दु:ख झाले त्याची अवस्था शाकुंतलेवर तोच प्रसंग ओढवल्यावर कशी होईल? खरे तर या कण्वशिष्यानी अशा प्रकारचे अनुभव पूर्वी कधीही घेतलेले नाहीत. तथापि निसर्गात घडणाऱ्या घडामोडीच त्यांचे भावनिक विश्व जगत असतात, जोपासत असतात. आप्तांचे मन ज्या अर्थी अशा दिशेने निराशात्मक विचार करते, नव्हे ते निसर्गातील रोज घडणाऱ्या घडामोडींनी ही अचानक उदास बनते. आणि कारणाशिवाय मन असे उदास झाले तर पुढे येणाऱ्या दु:खाची ती चाहूल होय.

येथील निसर्ग वर्णनाद्वारे कालिदासाची सूक्ष्म अवलोकन दृष्टी आणि मानसशास्त्रीय बैठक दृष्टोत्पत्तीस येते.

निसर्गाद्वारे सूचना देण्याचे कालिदासाचे वैशिष्ट्य खरोखरच अतुलनीय होय.

> इदं शश्वत्परिचितविविक्तेन मनसा
> जनाकीर्णं मन्ये हुतवहपरीतं गृहमिव ।। १०.५

मनाला नेहमीच एकांतवासाची सवय असल्याने गजबजलेले हे ठिकाण अग्नीच्या ज्वालांनी वेढलेल्या घराप्रमाणे भासते आहे. अशा प्रकारची भयानक कल्पना शार्ङ्गरव करतो यातून हे शाकुंतलेचे सौख्यसदन न होता अग्नीप्रमाणे दाहकता ओकणारे, दाहक शब्दांनी अंत:करण जाळणारे ठरणार आहे. या दुरिताची कल्पना येथे अग्नीच्या माध्यमातून दिली आहे.

निसर्ग केवळ दु:खासूचकच आहे असे नव्हे तर मानवाच्या सुखादु:खाशी तो पूर्ण एकरूप झाला होता. दु:खाची संकटाची चाहूल देणारा म्हणून जशी कामगिरी बजावली आहे तशी आगामी आनंदाची सूचना देण्याची कामगिरीही निसर्गाने केली आहे. ती अशी -

आताम्रहरितपाण्डुर, जीवितसर्व वसन्तमासस्य ।
दृष्टोऽसि चूतकोरक, ऋतुमंगल, त्वां प्रसादयामि ।। २६

तांबूस, हिरव्या, पांढुरक्या छटांनी शोभणाऱ्या आम्रकलिके तुझे दर्शन नुकतेच झाले आहे. वसंतमासाच्या सौंदर्याचे तू सारसर्वस्व आहेस. वसंताचे मूर्तिमंत मांगल्य असलेल्या तुझे स्वागत असो.

येथे पुनश्च ऋतुचक्र वसंताप्रत आले आहे. पण येथे हा वसंत काही वेगळेच सूचित करतो आहे. दुष्यन्ताच्या उपवानात प्रवेशलेला हा वसंत आम्रमंजिरीच्या रूपात विनटला आहे याचे कारण दुष्यन्ताच्या जीवनातही पुन्हा सौख्यवसंत फुलणार आहे. शाकुंतलेशी त्याचे पुनर्मीलन होणार आहे याची आगाऊ सुचना या वसंताने सर्वांना दिली आहे म्हणूनच अगदी वेळेवर तो येथे हजर झाला होता.

संपूर्ण नाटकभर निसर्ग अशा तऱ्हेच्या सुचना वेळोवेळी देत राहिला आहे.

अस्मिन्नशोकमूले तावदास्तामायुष्मान्
यावत्त्वामिन्द्रगुरवे निवेदयितुमन्तरान्वेषी भवामि ।। ३२७

"तू या अशोक वृक्षाच्या सावलीत थांब, तुझ्या आगमनाची वार्ता इन्द्राच्या पित्याला कळविण्याची संधी मी पाहतो"

इंद्रसारथी मातलीने राजाला अशोकवृक्षाखाली थांबविले. त्या मार्गावर इतर अनेक वृक्ष असतानाही अशोकवृक्षाचीच निवड कालिदासाने केली ती मोठया सूचकपणे !

अशोक म्हणजे शोकाचा अभाव. थोडयाच वेळांत राजाचा शोक राजाचे दु:ख संपणार आहे. राजा शोकरहित होणार आहे शाकुंतलेशी त्याची भेट होणार आहे हेच या अशोकावरून - कालिदासाला सुचित करावयाचे होते.

निसर्गाला लाभलेल्या या विविध भूमिकांतून आपल्या समर्थ अभिनय कौशल्याची स्वाभाविक रीतीने लयलूट निसर्ग करीत आला आहे. त्यामुळे हे नाटक केवळ मानवीरंगभूमीवरील नसून प्रकृतिजन्य आहे. असे म्हणावेसे वाटते.

एकटया शाकुंतलातच निसर्गाची ही सूचकता दिसते असे नव्हे तर भासालाही ही निसर्गसूचकता भावली आहे. त्याने "स्वप्नवासवदत्तम्" या त्याच्या नाटकात याचा वापर केलेला आढळतो.

खगावासोपेता: सलिलमवगाढो मुनिजन: ।
प्रदीप्तोऽग्निर्भाति, प्रविचरति धूमो मुनिवनम् ।
परिभ्रष्टो दूराद्रविरपि च संक्षिप्तकिरणो
रथं व्यावर्त्यासौ प्रविशति शनैरस्तशिखरम् ।। १६.१ स्व.

पक्षी आपल्या घरटयात परतले आहेत. तपस्व्यांनी पाण्यात उडया टाकल्या आहेत. [सायंस्नानासाठी]. चांगला धडाडून अग्नी पेटला आहे. तेजस्वी दिसतो आहे. त्याचा धूर तपोवनात पसरला आहे. खूप

उंचीवरून खाली घसरलेला सूर्य आपला किरणांचा पसारा गोळा करून आपलारथ हळूहळू पश्चिम पर्वताच्या शिखारावर उतरतो आहे.

अशा प्रकारच्या निसर्गाच्या दैनंदिन वातावरणाचे चित्रण करून भासाने त्यातील प्रत्येक पंक्तीमधून सूचकता साधली आहे. ती मनोवेधक अशी सूचकता पाहू या -

प्रथम पंक्तीत पक्ष्यांच्या घरट्यात परतण्याने राजगृहातून बाहेर पडलेली वासवदत्ता योग्य ठिकाणी पोहोचली-पद्मावतीच्या आश्रयास आली. इकडे उदयनाची प्रीतिदेवता वासवदत्ता आगीत जळाल्यामुळे त्याच्या मनातील विरहरूपी अग्नी चांगलाच भडकलेल्या अवस्थेत आहे. त्याचा धूर म्हणजे त्याची वार्ता, त्याच्या विलापकथा ब्रह्मचाऱ्याच्या रूपाने तपोवनापर्यंत पोहोचल्या आहेत. खूप उंचीवरून घसरलेल्या सूर्याच्या उल्लेखाने भासाने खुबीदारपणे उदयनाची घसरलेली राजकीय परिस्थिती सूचित केली आहे. तसेच या पद्यपंक्तीच्या उत्तरार्धात सूर्य पश्चिमेकडे निघाल्याचे वर्णन केले आहे. ही एक गुप्त नाट्यसूचना आहे असे मला वाटते. उदयनही वासवदत्तेच्या दु:खात चूर असला तरी सूर्याप्रमाणे हळूहळू पद्मावतीकडे त्याच्या मनाचा कल झुकणार आहे. घसरलेली राजकीय स्थिती सुधारण्यासाठी नाईलाजाने तो पद्मावतीशी विवाहबद्ध होणार आहे. अशा प्रकारची ही सूचना आहे.

निसर्गाद्वारे साधलेली अशीच एक सुंदर सूचकता -

"कामेनोज्जयिनीं गते मयि तदा कामप्यवस्थां गते
दृष्ट्वा स्वैरमवन्तिराजतनयां पञ्चेषव: पातिता: ।।
तैरद्यापि सशल्यमेव हृदयं भूयश्च विद्धा वयं
पञ्चेषुर्मदनो यदा कथमयं षष्ठ: शर: पातित: ।। १.४ स्व-

राजा उदयन आपले विचार विदूषकाजवळ व्यक्त करताना म्हणतो -

पूर्वी मी उज्जयिनीला गेलो असतां अवन्तीराजकन्येला पाहून कामदेवाच्या पाचही बाणानी माझी स्थिती अनाकलनीय अशी केली त्याची वेदना अजून माझ्या मनातून गेली ही नाही तोवरच- मदनाने मला, पुन्हा मला घायाळ केले. मदनाचे पाचही बाण पूर्वीच संपले असता हा सहावा बाण त्याच्याकडे आला कोठून ?

मदन ही कामदेवता. त्याचे पंचबाण हे दुसरे नांव - ते पाच बाण म्हणजे अरविन्द, अशोक, आम्रमंजिरी, नवमल्लिका [जाई / मोगरा] आणि निळे कमळ हे होत. या बाणांच्या सहाय्याने मदन लोकांना घायाळ करतो आणि त्यामुळे ते प्रेमात पडतात व त्यांना विरहाचे दुःख जाणवू लागते. असा संकेत आहे. उदयन उज्जयिनीत गेला असता वासवदत्ता त्याच्या दृष्टीस पडली आणि तिच्या सौंदर्याने मोहित होऊन त्याचे देहभान हरपले. हीच मदनाला उत्तम संधी मिळाली. आणि आपले सारे बाण राजावर टाकले म्हणजेच राजा अगदी पुरापुरा घायाळ झाला. पण आता पद्मावती विषयीही राजाला थोडीफार आपुलकी वाटू लागली. आहे. अर्थात वासवदत्तेच्या मानाने फारच कमी [कारण येथे मदनाच्या एकाच बाणाचा उल्लेख आला आहे] पण ती तरी का वाटावी ? असा प्रश्न राजमनाला भेडसावती आहे कारण मदनाने आपले पाचही बाण वासवदत्तेच्या वेळीच वापरून टाकले होते. आणि मदन तर पञ्चबाणच आहे. मग हा सहावा बाण त्याच्याकडे आला कोठून ? शिवाय या बाणाने मदनाने त्याच्या जखमेवरच घाव घातला आहे. बाणाचे लक्ष्यही हृदयच आणि प्रेमभावनेची वसतीही हृदयातच म्हणून विरहाचे वसतिस्थान हृदयच नेमका तिथेच बाण लागला आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आधीच्या प्रहाराचे म्हणजे वासवदत्तेच्या विरहाचे दु:ख अजून राजाच्या मनात ताजेच आहे.

या अनङ्गाच्या सहकार्याने भासाने बरेच काही सूचित केले आहे. वासवदत्तेइतकी पद्मावतीची ओढ त्याला वाटत नव्हती हे पाच बाणांचा प्रयोग आणि एका बाणाचा प्रयोग यावरून सूचित होते. तसेच विरहामुळे तो दु:खी झाला आहे. त्याच्या मनाची ती जखम अद्याप ओली आहे. आणि तशातच पुन्हा मदनाने त्याच जागी जखमेवर बाण मारला आहे. म्हणजे पद्मावती विषयी थोडयाफार प्रमाणात राजाच्या मनात प्रेमभावना उदयास येऊ लागली आहे. इ. सर्व गोष्टी भासाने निसर्गाद्वारे सूचकपणे साधल्या आहेत.

निसर्ग केवळ मानवी मनोभावना, नाटकीय सूचना यासाठीच पुढे सरसावला आहे असे नव्हे तर त्याला शास्त्रीय बैठक ही आहे. कथानक प्रवाही ठेवण्यासाठी पुढील घटनांची कलात्मक सूचना देण्यासाठी नाटककाराला काही योजना कराव्या लागतात त्यापैकी एक पताकास्थानक. पताकास्थान म्हणूनही श्रीहर्षाने "रत्नावलीमध्ये निसर्गाचा उपयोग करून घेतलेला आढळतो.

बागेतील उका लतेला फुले आली आहेत आणि ती आलेली पाहून मत्सरामुळे राणीला राग येईल व तिचे मुख रागाने तांबडे लाल होईल असे उदयन जाता जाता सहज म्हणतो पण दुसऱ्याच एका कारणावरून वासवदत्तेला पुढे लवकरच राग येणार आहे. व ही भावी घटना येथे उत्तम तऱ्हेने सूचित झाली आहे.

कालिदासाची शाकुंतलाखालोखाल विद्वान्मान्य ठरलेली नाट्यकृती म्हणजे "विक्रमोर्वशीयम्" कालिदासाला निसर्गप्रेमी कवी म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शाकुंतलाप्रमाणे विक्रमोर्वशीयातही निसर्गाचा वापर उदंड प्रमाणात केलेला आढळतो. त्यातील सूचक निसर्गाची काही रूपे -

"अहो लताविटपे एषा एकावली वैजयान्तिका मे लग्ना। सखि चित्रलेखे। मोचय तावदेनाम्।" अग चित्रलेखे, माझी ही एकपदरी मोत्यांची माळ वेलीच्या फांदीत अडकली। ही सोडव तरी ही।

येथे उर्वशीला काही काळ थांबण्यास कारण मिळाले शिवाय उर्वशीचे हृदय पुरुरव्याच्या ठायी गुंतले आहे हे सूचित होते. केवळ एवढेच नव्हे तर चित्रलेखा यावर म्हणते दृढं लग्ना खलु सा। ही तर अगदी जाम गुंतली की तिला सोडवणे अवघड आहे. आता ही जी गुंतागुंत आहे ती सोडवणे कठीण आहे. मन गुंतल्याची ही सूचना आहे. उर्वशी स्वर्गात जाताना आपले मन मात्र पुरुरव्याजवळच ठेवून गेली. त्यामुळे पुन्हा जेव्हा चित्रलेखा एकटीच आलेली दिसते तेव्हा राजा खट्टू होतो तो तसे बोलूनही दाखवितो.

न तथा नन्दयति मां सख्या विरहिता तया
सङ्गमे दृष्टपूर्वेवं यमुना गङ्गया यथा ।। १४. २. वि

यातून अधीर नायकाचे दर्शन घडते. त्याची उर्वशीला भेटण्याची अधिरता स्पष्ट होते. तेव्हा चित्रलेखा सांगते -

"ननु प्रथमं मेघराजि: दृश्यते पश्चाद् विद्युल्लता।"

आकाशात प्रथम मेघांची दाटी होते मग विद्युल्लता दिसते. विद्युल्लतेच्या आगमनाची वार्ता मेघराजी देते. त्याप्रमाणे मी उर्वशीच्या आगमनाची वार्ता देण्यासाठी तिची दूती होऊन आले आहे. ती पाठोपाठ आहेच असा अभिप्राय यातून व्यक्त होतो.

उर्वशीचे दर्शन तत्काळ न घडविता तिला तिरोरूप ठेवून तिच्या भेटीची पुरुरव्याची इच्छा कालिदासाने शिगेला पोहोचविली आहे.

एता: सुतनु मुखं ते सख्य: पश्यन्ति हेमकूट गता:
उत्सुकनयना लोकाश्चन्द्र मिवोपप्लवान्मुक्तम् ।। १२ ।। वि.

ग्रहणातून सुटलेल्या चंद्राचे मुख न्याहाळावे तद्वत तुझे मुख तुझ्या सख्या न्याहाळत आहेत.

येथे केशीदानवरूपी राहूने उर्वशीरूपी चंद्राला ग्रासले होते ते ग्रहण ते संकट नष्ट झाले. उर्वशी आता संकटमुक्त झाली आहे हे कवीने येथे सूचित केले आहे.

यदिदं रथसंक्षोभाद्ङ्गेनाङ्गं ममायते क्षणाया
स्पृष्टं सरोमकण्टकमङ्कुतिं मनासिजेनेव ।। १३ ।।

येथे तर कालिदासाने पताकास्थानक मुखसंधी आणि सुचकता या तीन गोष्टी निसर्गाद्वारे साधल्या आहेत.

रोमकण्टकानि कामेन इव अङ्कुरितानि.। येथे पुरुरवा आणि उर्वशी यांच्या प्रेममीलनाचे बीज पेरले आहे.

अशीच आणखी एक सुरेख सूचकता -

निष्प्रिचंन माधवी लतां कौंदींच लासयन
. स्नेह दक्षिण्ययोर्योगात् कामोव प्रतिभाति मे ।। ४. २

उर्वशोवर प्रगाढ प्रेम आणि ... औशिनरी विषयी केवळ
दाक्षिण्याचो सूचना वरोल निसर्ग प्रतिमानांद्वारे कालिदासाने दिलो आहे.

मम कुसुमिता स्वपि सखो नो पवनलतासु नम्रविटपासु।
चक्षुर्वध्नाति धृतिं तदङ्गनालोक दुर्ललितम् ।। ८. २ वि.

त्या सुंदरोला पाहण्यास उत्सुक असलेलं हे नेत्र या उद्यानातोल फुललेल्या
आणि वाकलेल्या लतांवर ठरत नाहोत।
अन्त:पुरातोला अनेक रूपवतींच्या बाबतोतली अनाकर्षणाची भावना
येथे सूचित केलो आहे.

ननु वक्तव्यं स्थानान्तरगत: स्वर्ग इति
उर्वशो राजा पुरुरव्याच्या नगरोतोल नंदनवन पाहून " याला तर दुसरा
स्वर्गच म्हंटले किंवा हा दुसरा स्वर्गच इथे अवतरला आहे" असे म्हणाते.

यातूनच तिला आता त्या स्वर्गात स्वारस्य उरले नाहो तर
इथेच माझा स्वर्ग किंवा हा हो माझा दुसरा स्वर्गच अशा तऱ्हेचो
मनोभावना सूचित करावयाचो आहे.

उष्णार्त: शिशिरे निषीदति तरोर्मूलालवाले शिखो,
निर्भिद्योपरि कर्णिकारमुकुलान्यासेरते षट्पदा : ।
तप्तं वारि विहाय तोर नलिनी कारण्डव: सेवते
क्रोडावेश्मनि चैव पञ्जरशुक: क्लान्तो जलं याचते ।। २२

मोर उन्हाळयाने त्रासून झाडांच्या थंड आळयात [बुंध्याशी] बसले आहेत. भ्रमर कण्हेरीच्या कळयांची तोंडे उघडून त्यांतपहुडले आहेत. जलकुक्कुट गरमपाणी त्यागून किना-यावरच उमललेल्या कमलिनीचे सेवन करीत आहेत आणि तहानेने व्याकूळ झालेला पिंज-यांतील पोपट पाण्याची याचना करून लागला आहे.

या सर्व वर्णनावरून मोर भ्रमर जलकुक्कुट यांच्या माध्यमातून उर्वशीची भेट होऊनही पुरुरवा त्रस्तच आहे. तृषित आहे हे सूचित होते.

उर्वशी व पुरुरवा यांची भेट होऊन भावनात्मक संवाद शृंखला सुरवातीनंतर थोडयाच काळात खंडित होते. उर्वशी प्रकट होऊन आपले मनोगत व्यक्त करते. पुरुरवा तिला आपल्या शेजारी शिलातलावर बसवितो स्वढयातच देवदूत इंद्राचा निरोप घेऊन येतो. त्यामुळे राजाला प्रणयाराधनास, वावच मिळत नाही. हेच मोराच्या,पोपटाच्या माध्यमातून येथे सूचित केले आहे. तसेच -

"कच्चुकी - देव, देवी आज्ञापयति, मणिहर्म्यपृष्ठे सुदर्शनिश्चन्द्र : तत्र संनिहितेन देवेन प्रतिपालयितुमिच्छामि यावद्रोहिणी संयोग: । इति"

मणिहर्म्यप्रासादाच्या गच्चीवरील चंद्राचे दर्शन मन लुभावणारे असते. तेथेच महाराजांच्या संगतीत चंद्रदर्शन घेऊन व्रताची सांगता करण्याचे आपले मनोरथ राणी औशिनरी कंचुकीद्वारे राजास कथन करते. तेव्हा ती हे ही स्पष्ट करते की जोपर्यंत चंद्राचे रोहिणीशी मीलन होत नाही तोपर्यंतच मी आपल्यासमवेत राहीन.

येथे एका दृष्टीने राणीने आपला पराभव पत्करून राजाला केलेली ही विनंती तिच्या मोठेपणाची साक्ष देते. शिवाय राजासमवेत चंद्रदर्शनाची इच्छा अर्थात राजाच्या सहवासाची इच्छा महाराणी करते. पण ती हे ही सूचित करते की, चंद्राचे रोहिणीशी मीलन होईपर्यंत मी आपल्यासमवेत राहीन. यातून जोपर्यंत पुरुरवा-उर्वशीचे मीलन होत नाही. तोपर्यंत तरी पुरुरवाने आपल्या संगतीत राहावे असे औशिनरीला वाटते. तिचा समजुतदारपणा आणि तिने घेतलेली यशस्वी माघार या उदाहरणातून कालिदासाला सुचवायची आहे.

अशा प्रकारे प्रियानुप्रसादनव्रताद्वारे तिने राजाला त्याच्या उर्वशीविषयक प्रणयाराधनाला राजरोस सम्मती दर्शविली आहे.

— ० —